# ।। परम पिस्तावो ग्रंथ ।।
# मारवाडी + मराठी
# सत्संग

महत्वाची सुचना:– रामद्वारा जळगांव यांचे असे निदर्शनास आले आहे की,काही रामस्नेही शेठ साहेब राधाकिसनजी महाराज व जे.टी.चांडक यांनी अर्थ केलेल्या वाणीजी रामद्वारा जळगांव मधून घेऊन जातात व आपल्या वाणीजीचा गुरु महाराज सांगतात तसा पुर्ण आधार न घेता आपल्या मताने समजने,अर्थामध्ये परस्पर बदल करुन टाकतात तरी वाणीजी घेऊन गेलेल्या कोणत्याही संताने परस्पर अर्थामध्ये बदल करु नये.काहीही बदल करायचा वाटत असल्यास रामद्वारा जळगांवशी संपर्क साधावा व नंतर बदल करावा.

✻ वाणीजी आमच्याकडून जशी पाहिजे तशी चेक झालेली नाही,चेक करायला भरपूर वेळ लागतो.आम्ही परत चेक करुन पुन्हा लोड करुन देऊ.याला वर्षभर तरी लागेल. तुमच्या समजण्यापुरता कामात येईल,यासाठी आम्ही वाणीजी वाचण्याकरीता लोड करुन दिली आहे.

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।। राम

।। अथ परम पिस्तावो ग्रंथ लिखंते ।।

।। दोहा ।।

**भगत बिसारी राम की ।। मिनखा देही पाय ।।**
**पिस्तासी सुखराम के ।। लख चोरासी मांय ।।१।।**

मनुष्य शरीर मिळाले आणि मनुष्य शरीर मिळाल्यावर चौऱ्यांशी लक्ष मिटवून देणाऱ्या रामजीची भक्ती केली नाही तर तो मनुष्य पुढे चौऱ्यांशी लक्ष योनीच्या महादु:खात पडल्यावर चौऱ्यांशी लक्ष योनी मिटवून देणाऱ्या रामजीची भक्ती न केल्या कारणाने पश्चाताप करतो असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।।१।।

**जुण जुण पिस्तावतो ।। मानव देह के काज ।।**
**राम शिवर सुखराम के ।। वो मोसर हे आज ।।२।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,चौऱ्यांशी लक्ष योनीचे दु:ख मिटविण्या –साठी प्रत्येक योनीत रामजीची भक्ती करणे चाहत होता परंतु प्रत्येक योनीने रामजीची भक्ती होत नव्हती याकरीता प्रत्येक योनीत ज्या योनीने रामजीची भक्ती होते अशा मनुष्य योनीची चाहणा करत होता.तो मनुष्य देह आज मिळाला आहे या करीता तू आजपासून रामस्मरण कर.।।२।।

**लख चोरांसी भुगत कर ।। नर तन पायो नीट ।।**
**सुखराम राम शिवऱ्यो नही ।। तो पसवा पंखी कीट ।।३।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,चौऱ्यांशी लक्ष योनीत दु:ख भोगून भोगून मोठ्या मुश्किलीने मनुष्य शरीर मिळाले आहे.जर आता रामनामाचे स्मरण केले नाही तर पुढे पुन्हा चौऱ्यांशी लक्ष योनीत दु:खाने ग्रासलेले पशु,पक्षी,कृमी,किटक व्हाल आणि पुन्हा भारी दु:ख भोगाल.।।३।।

**मरत लोक मे मानवी ।। देव लोक में देव ।।**
**सुखीया सब पिस्तावसी ।। जो भुला हर की सेव ।।४।।**

ज्यांनी रामाची भक्ती केली नाही असे मृत्युलोकाचे मनुष्य तसेच मनुष्य शरीर सोडून देवता लोकात पोहचलेले सर्व देवता चौऱ्यांशी लक्ष योनीत पडल्यावर हरची भक्ती न केल्या कारणाने पश्चाताप करतील असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगून राहिले आहेत.।।४।।

चोपाई ।।

**चोरासी बंछ तो नर देही ।। भगत काज पिस्तायो ।।**
**हल हुँसीयार करो नर शिम्रण ।। वो मोसर अब आयो ।।५।।**

जेव्हा मनुष्य चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये होता तेव्हा मनुष्य शरीर प्राप्त करण्याची चाहणा करत होता आणि सोबत चौऱ्यांशी लक्ष योनीत यायच्या आधी मनुष्य देह होता त्या

देहात भक्ती नाही केली आणि चौऱ्यांशी लक्ष योनीच्या शरीराने भक्ती होत नाही याचा ही पस्तावा करत होता.त्याच मनुष्य देहाची वेळ आज आली आहे म्हणून हुशार होऊन कोणताही विलंब न करता रामजीचे स्मरण करा असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगत आहे.।।५।।

**भटकत भटकत नीट मिल्यो हे ।। मानव तन ओतारा ।।**
**सुरपत देव सकळ सो बंछे ।। मिले न दुजी बारा ।।६।।**

हे मानव तन म्हणजे चौऱ्यांशी लक्ष योनी कापण्याचा अवतार चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये मोठे मोठे जुलूम,कष्ट सहन करुन भटकता भटकता मोठ्या मुश्किलीने थोड्या वेळा करीता मिळाला आहे.हे मनुष्य शरीर सुटल्यावर स्वर्गादिकाचे सर्व देवता तसेच इंद्रासारख्या देवताने चाहणा केल्यावरही चौऱ्यांशी लक्ष योनी भोगल्या शिवाय पुन्हा मनुष्य देह मिळत नाही.।।६।।

**बाळक तरण बुढापो बीतो ।। अजहुं राम न गावे ।।**
**चोरासी फिर नर तन पायो ।। चाम सोवनी जावे ।।७।।**

अरे मनुष्य,तुझे बालपण पूर्ण व्यतीत झाले,जवानी व्यतीत झाली,मरण कोणत्याही क्षणी येऊ शकते असे म्हातारपण व्यतीत झाले तरीही चौऱ्यांशी लक्ष योनीच्या दु:खातून काढणाऱ्या रामनामाला गाऊन नाही राहिला.अरे मनुष्य,हे नर तर चौऱ्यांशी लक्ष योनी भोगल्यानंतर मिळाले आहे,अशा ह्या मनुष्य देहाची सोन्यासारखी वेळ जाऊन राहिली आहे.।।७।।

**नर तन खेत नांव कण निपजे ।। मोती पुळका बाया ।।**
**निपज्या संत साख फळ फूली ।। भर गाड़ा घर लाया ।।८।।**

शेतात वेळेवर बीज पेरल्याने मोतीसारखे धान्य निपजते.पेरणाऱ्याची शेती फळल्या फुलल्याने मोतीसारखे धान्य गाड्यांनी भरभरुन घरी येते.जर हे बीज वेळेवर नाही पेरले तर शेती असूनही शेती फळत फुलत नाही आणि मोत्यासारखे धान्य घरी येत नाही. अशाप्रकारे मनुष्यरुपी शेतात रामनाम पेरल्याने रोमारोमात नाम प्रगटते आणि जीव चौऱ्यांशी लक्ष योनीत जाण्यापासून मुक्त होतो.।।८।।

**आस आसाडु चाम सोवनी ।। समज बीज नही बायो ।।**
**अन्त काळ काती को करसो ।। भजन बिना पिस्तायो ।।९।।**

जसे आषाढाच्या महिन्यात समजून बीज पेरले नाही तर(कार्तिक मध्ये)धान्य घरी येत नाही आणि शेतकरी पश्चाताप करतो.अशाप्रकारे मनुष्य देहरुपी सुवर्ण संधीवर रामनामाची भक्ती न केल्याने अंतकाळी चौऱ्यांशी कापणारा राम घटात प्रगट नाही झाला याचा पश्चाताप होतो. ।।९।।

जाझ फटया जळ थाह न आवे ।। आभ फटया नही थूणा ।।
अन्तकाळ एेसी बिध बरते ।। जे नर भक्त बिहुँणा ।।१०।।

जहाज भरलेल्या समुद्रात मधोमध आहे आणि जहाज वाईट तऱ्हेने फुटून गेले आहे ज्याच्याने जहाजात थाह येत नाही असे पाणी घुसत आहे आणि जहाजात अटकलेल्या स्त्री,पुरुषांना समोर मरण दिसून राहिले आहे असेच आभाळ फाटले आहे फाटलेल्या आभाळांना कोठूनही खांब लावता येत नाही आहे म्हणजे आभाळ फाटणे थांबवता येत नाही आहे आणि आरामाचे सर्व स्थान जलमय होत आहे आणि जलमय झाल्या कारणाने मरण समोर दिसून राहिले आहे. अशा प्रकारे रामनामाच्या भक्तीशिवाय यमदूतांना पाहून मनुष्याची अशी बिकट स्थिती होते. ।।१०।।

देख दूत मानव पिस्ताणा ।। अन्तकाळ अब आया ।।
सुखरत कियो न राम संभाल्यो ।। ग्रभ कोल बिसराया ।।११।।

यमदूतांना पाहून स्त्री–पुरुष मनुष्य देह मिळाल्यावरही यमदूतांपासून वाचण्याचा कोणता शुभ कर्म केला नाही,यमदूतांपासून वाचवणाऱ्या रामजीचे स्मरण केले नाही आणि गर्भात रामनाम घेण्याचा आणि शुभ शुभ कर्म करण्याचा जो करार केला होता तो थोडासाही पूर्ण  केला नाही याचा पश्चाताप करतो.।।११।।

धरम राय जब लेखा मांगे ।। किया कोल चितारे ।।
लीला पांव करे मुंह काळो ।। शिर मे मुगदर मारे ।।१२।।

रामजीच्या दरबारात मनुष्य तन मागितले आणि रामनामाची भक्ती करीन,रामनामी संतांची सेवा करीन असा धर्मरायाशी रामजीच्या दरबारात करार केला होता.जीवाचा अंतीम समय येतो.जीव देह त्यागतो तेव्हा यमदूत धर्मरायाच्या समोर पकडून घेऊन जातात आणि उभे करतात तेव्हा धर्मराय करारानुसार जीवाने रामनाम नाही केले तसेच संतांची सेवा नाही केली आणि नरकात पडण्यासारखे निचहून निच कर्म केले असे चित्र–गुप्त सांगतात तेव्हा धर्मराय यमदूतांना जीवाचे हात,पाय हिरवे होईल तो पर्यंत अनेक प्रकारच्या अस्त्रांनी मारायला सांगतो,तोंड मारुन मारुन काळे पडेल तो पर्यंत मारायला सांगतो तसेच डोक्यावर भारी खिळ्यांनी बनलेल्या मुगदरने मार देववितो. ।।१२।।

हँस हँस किया न छुटे रोयां ।। किया कबाडा हाता ।।
घड़ी घड़ी दम दम का लेखा ।। चित्र गुप्तर के खाता ।।१३।।

जीव येथे हसून हसून म्हणजे आनंद घेऊन घेऊन दुसऱ्यांना अती दुःख पडतील असे कुकर्म करतो.हे हसून हसून हाताने केलेले कुकर्म तेथे रडल्याने ही सुटत नाही.येथे जे ही घडी घडी पळापळात केलेल्या कुकर्माचा लेखाजोखा म्हणजे हिशोब चित्र–गुप्तच्या

खात्यात लिहिला असतो.।।१३।।

**पूंतो धणी चोर पिस्तायो ।। माल बिराणा खावे ।।**
**तोडे शीश नाक कर काटे ।। भसमी खाल भरावे ।।१४।।**

दुसऱ्यांचा माल हडपण्यासाठी चोर चोरी करतो.चोरी करण्याच्या वेळी मालाचा मालक काही कारणाने तेथे पोहचून जातो आणि चोराला पकडतो.चोर पकडल्यावर पस्तावा करतो,रडतो तरीही त्याचे शिर तोडतो,नाक कापतो,हात कापून टाकतो,त्याची कातडी काढून त्यात भूसा भरतो हा दंड भोगावाच लागतो.।।१४।।

**पातशां की हुरमां होती ।। लागी लार पिंजारा ।।**
**पडी पेजार पछे पछतानी ।। जलम गमायो जारा ।।१५।।**

बादशहाची बेगम बादशहा सोडून कापूस पिंजणाऱ्या पिंजाऱ्याच्या मोहात राज दरबार त्यागून देते आणि पिंजाऱ्याच्या सोबत पिंजाऱ्याच्या घरी जाते.पिंजारी कापूस पिंजे आणि त्या बेगमलाही कापूस पिंजायला लावी.आरामात राहणाऱ्या बेगमला कापूस पिंजण्याचे काम जीवावर येई.ते काम टाळण्यासाठी ती त्या पिंजाऱ्याला आपल्या अंगावरचा दागिना देते.असे हे नित्य नियमाने चालते परंतु काही वेळे नंतर बेगमचे सर्व दागिने संपून जातात. कापूस पिंजायचे काम पडले तर बेगम कापूस पिंजायला नाही म्हणते आणि कोध्रित पिंजाऱ्याला शांत करण्याकरीता आता अंगावर दागिनेही राहत नाही या कारणाने पिंजारी बेगमला बुटांनी मारतो,हा मार बेगमच्या ने सहन होत नाही तेव्हा पळापळात बादशहाला आठवण करते परंतु आता बेगमला पस्ताव्या शिवाय हाती काही येत नाही.अशाप्रकारे जीव रामजीला सोडून स्वर्गादिक म्हणजे(ब्रम्हा,विष्णु, महादेव)तसेच नरकादिक म्हणजे(भैरु,पीर,दुर्गा,खेतपाल इत्यादी)देवतांच्या मागे लागून गेले तेव्हा जीवांवर नरकीय कर्मांचा मार पडू लागला तसेच चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये दुःख पडू लागले.जसे बेगम ने बादशहास सोडून पिंजाऱ्याशी व्यभिचार करण्यात जन्म गमावून दिला असेच जीव अन्य होणकाळी देवतांच्या सुखांमध्ये रमून मनुष्य देह गमवून देतात. ।।१५।।

**आन जार कुं फिर फिर पूजे ।। हरसुं बेमुख होई ।।**
**गिणंका ज्युं जिण तिण की जोरूं ।। पतवरता नही कोई ।।१६।।**

जीव रामजीला सोडून मायेचे सुख देणारे परंतु काळाच्या मुखात ढकलून देणाऱ्या देवतांना उठून उठून पुजू लागतात आणि रामजीपासून दूर होऊन जातात.जशी वेश्या एका पतीची न बनता अनेक पुरुषांची पत्नी बनते.अशी अनेक पुरुषांची पत्नी बनणाऱ्या वेश्येला कोणीही पतीव्रता म्हणत नाही आणि तिच्या अंतीम समयी तिला पती नसल्याकारणाने सुखाच्या सतवाड्च्या देशात जाता येत नाही.अशाप्रकारे जीवाला

रामजीला त्यागून काळाच्या मुखात ठेवणाऱ्या देवतांची भक्ती केल्याने महासुखाच्या परमपदास जाता येत नाही.तीन लोकात काळाचे महादुःख भोगत रहावे लागते.।।१६।।

**बिणज ठग्यो बाण्यो पिस्तायो ।। नर तन नांव बिसाऱ्यो ।।**
**कह नही सके मन ही मन छीजे ।। साजी सोदे हाऱ्यो ।।१७।।**

व्यापार करण्यात वाणी म्हणजे सावकार ठगल्या जातो.तोटा झाल्याकारणाने तो वाणी म्हणजे सावकार मनातल्या मनात पस्तावत राहतो आणि दुःखी बनून राहतो आणि तोटा झाला हे दुःख कोणाशी वाटून ही कमी करु शकत नाही.याचप्रकारे जीव नर तनात नाम घेणे विसरुन गेल्या कारणाने चौऱ्यांशी लक्ष योनीत दुःख भोगतो आणि दुःख हरण करणारे नाम घेणे विसरुन गेला म्हणून पस्तावीत राहतो.।।१७।।

**मृघ जळ धाय मृघो पिस्तायो ।। सेंबळ सेवर जुवा ।।**
**कांच महल कूकर पिस्तायो ।। युंई भुक भुक मुवा ।।१८।।**

तहानलेला मृग तपलेल्या रेताळ जमिनीवर तहान मिटविण्यासाठी पाणी शोधतो.त्याला जमिनीवर जेथे उभा आहे तेथून काही अंतरावर जमीन,जमीन दिसत नाही त्या जमिनीच्या जागी पाणीच पाणी दिसते.ते पाणी,पाणी नाही,हे तो मृग(हरीण)समजत नाही आणि हे न समजल्या कारणाने आणि पाण्याची तहान मिटविण्याची गरज असल्याकारणाने तो आपली तहान मिटविण्यासाठी पाणी नसुन पाण्यासारख्या दिसणाऱ्या खोट्या पाण्याला खरे पाणी समजून जवळ पोहचण्यासाठी पळतो.जसे जसे पळतो तसे तसे त्याला दिसणारे पाणी जेथून पळत आहे तेथून तितक्याच अंतरावर दिसत राहते.ते पाणी खरे पाणी नसल्याकारणाने शेवट पर्यंत त्याची तहान मिटत नाही आणि पळून पळून थकून जातो.थोडेसेही चालण्याचे बळ बाकी राहत नाही. अंतीम मध्ये बळ थकल्यानंतर जमिनीवर पडून जातो.खोट्या पाण्याला खरे पाणी समजले याकरीता पस्तावतो आणि मरुन जातो.अशाप्रकारे स्त्री-पुरुष अन्य देवतांच्या भक्तीने मृगजळासारखे सुख मिळतील असे मानून घेतात परंतु अंतसमयी हे देवता काळाच्या तावडीतून तर मुक्त करु शकले नाही उलट ८४ लक्ष योनीच्या दुःखात पडून गेले हे पाहून पस्तावतात आणि दुःख भोगतात.

असेच काटसावरीचे झाड असते.त्याला लाल लाल,मोठे मोठे फुल लागतात.ते पाहून पोपट झाडाचे फुल इतके चांगले आहे तर फळ ही खूप चांगले लागतील असा विचार करुन त्या फुलांच्या जवळ फळांची वाट पाहत बसून जातो.पुढे जाऊन फुलांपासून आंब्यासारखे सुंदर फळ लागतात.कच्चे फळ पिकतील आणि खाण्याचा आनंद घेऊ असे मनात विचार करुन आणखीही वाट पाहतो.फळ पिकतात आणि फुटतात. त्याच्यातून खाऊन आनंद देणारा रस निघत नाही,उलट उडणारा कापूस निघतो.

इतक्या दिवस भुकेला,तहानलेला फळाच्या आशेत बसलेला पोपट दु:खी होऊन जातो आणि मनातल्या मनात पस्तावतो.असेच सर्व स्त्री–पुरुष अन्य देवतांच्या भक्त्यांपासून तृप्त सुख मिळतील ही आशा लावतात आणि ती आशा पूर्ण होत नाही उलट काळाचे दु:ख पडतात तेव्हा दु:खी होऊन जातात आणि पस्तावतात.

जसे काचेच्या महालात कुत्रा घुसून जातो.महालात घुसल्यावर त्याला महालात त्याच्याच सारखे काचात अनेक कुत्रे दिसायला लागतात.कुत्र्याचा स्वभाव कुत्र्याच्या समोर कुत्रा दिसला तर भुंकण्याचा राहतो.कुत्रा हे नाही समजत की तो जिथे घुसला आहे तो काचेचा महाल आहे आणि काचेचा हा गुण आहे की,काचेच्या समोर जो येईल तसेच त्या काचेतून दिसेल.याकरीता त्याला महालात घुसताच त्याच्या समोर चोहिकडे कुत्रे दिसू लागतात.काचेतील कुत्र्यांना पाहून घुसलेला कुत्रा भुंकतो.जसे तो कुत्रा जितक्या ताकदीने भुंकतो तसेच काचेतील दिसणारे सर्व कुत्रे त्याला भुंकताना दिसतात.भुंकून–भुंकून थकून जातो,बलहिन होऊन जातो आणि शेवटी जमीनीवर पडतो आणि मरुन जातो.याचप्रकारे मायेचे वेद,व्याकरण,शास्त्र,देवी देवतांच्या भक्तीत स्त्री–पुरुष परमात्मा शोधतात,अंतकाळ येऊन जातो.मरुन जातात परंतु सुख देणारा परमात्मा मिळत नाही म्हणून पस्तावतात. ।।१८।।

**गागर फोड चली घर रीती ।। पिस्तावे पिण हारी ।।**
**खोयो द्रब जलम युं हार्‍यो ।। ज्युं जुवा खेल जुवारी ।।१९।।**

एका स्त्रीने मुंगुस पाळलेला असतो,तिला एक लहान मुल असते.ती स्त्री पाणी आणण्यासाठी घरापासून लांब विहिरीवर नेहमी जात असायची.पाणी आणायला जाई तेव्हा आपल्या बालकाला पाळण्यात झोपवत होती आणि बालकाची रक्षा करण्या करिता मुंगूसास बसवून देत होती.मुंगूस बालकाची राखणदारीही करत होता आणि जेव्हा मुल उठायचे आणि रडायचे तेव्हा त्याच्या पाळण्याची दोरी ताणून त्याला खेळवत होता आणि झोपवत होता.एके दिवशी रोजच्यासारखे मुलाला झोपवून आणि त्या मुंगूसास त्याच्याजवळ बसवून पाणी आणायला जाते.ती गेल्यानंतर एक असली भयंकर नाग मुलाच्या पाळण्यात घुसू लागतो.मुंगूस मुलाच्या रक्षणाकरिता त्या नागाशी लढतो,त्या नागाचे तुकडे तुकडे करुन मारतो आणि मुलाला थोडासाही धक्का न लागू देता वाचवतो.या वाचवण्याच्या आनंदात तो मुंगूस मुलाच्या आईला मुलाला थोडासाही धोका नाही झाला हे सांगायला मुलाची आई येणाऱ्या रस्त्यावर बसून जातो.काही वेळेनंतर पाण्याची घागर घेऊन मुलाची आई परतते. मुलाच्या आईला मुंगूस रक्ताने भरलेला दिसतो.मुलाची आई मुलाच्या मोहाच्या वश झाल्याकारणाने हा विचार करुन घेते की मुंगूसाने माझ्या मुलाला मारुन टाकले म्हणून तो रक्ताने लथपथ झाला.

मागचा पुढचा कोणता विचार न करता पाण्याने भरलेली घागर मुंगूसवर जोरात आपटून देते ज्याच्यात मुंगूस जागेवरच मरुन जातो आणि पाण्याने भरलेली घागरही फुटून जाते.घरात रक्त रक्त घुसते तर पुढे बालक मस्तीत खेळतांना दिसतो आणि तुकडे–तुकडे झालेला नाग मेलेला पडलेला दिसतो. ज्या मुंगुसने आपली पूर्ण शक्ती लावून मुलाला वाचवले आणि त्यालाच विचार न करता मी मारुन टाकले याकरीता पस्तावू लागते.याचप्रकारे जगाचे स्त्री–पुरुष काळापासून मुक्त करणाऱ्या संताला कोसतात,दु:ख देतात,खूप निंदा करतात.येथपर्यंत की कोण्या–कोण्या संताला जीवावर मारण्यापर्यंत उठून जातात परंतु तेच स्त्री–पुरुष अंतसमयी नरकात टाकणारे काळाचे क्रोधित दूत पाहून भयंकर घाबरतात आणि काळापासून वाचवणाऱ्या संताला दु:ख दिले,कोसले, निंदा केली,जीवे मारले आणि त्यांचे नाही ऐकले यासाठी पस्तावतात. जुवारी जुवा खेळतो.जुव्यात हारतो.घराचे धन,पत्नी,पुत्र डावावर लावतो आणि शेवटी धन,पत्नी,पुत्र, गमवून देतो.याप्रकारे सर्व गरजेच्या वस्तू हातातून निघून जातात. सर्व वस्तू निघून गेल्यावर क्षणाक्षणाला पस्तावतो.याचप्रकारे स्त्री–पुरुष ८४ लक्ष योनीचे जुलूम सहन करुन–करुन मिळालेला अमोलक मनुष्य देह वेद,व्याकरण,शास्त्र,पुराण व रामजी सोडून अन्य देवी देवतात व्यतीत करतात,तरीही ८४ लक्ष योनीपासून मुक्ती होत नाही म्हणून पस्तावतात.।।१९।।

**पर मुलक पंथी पिस्तायो ।। मेरो मिंत न कोई ।।**
**दूर दिसतंर ओघट घाटा ।। संग वि अेक न दोई ।।२०।।**

जसे परदेशात जाऊन वाटसरु आपला मित्र,हितैषी कोणी नजरेस न आल्या कारणाने पस्तावतात.आता परतून आपल्या देशाला जायचे तर रस्त्यात मोठमोठे पहाड,मोठमोठे जीव घेणारे जनावर,मोठमोठे सागर समोर दिसतात आणि सोबतच एखाद दुसरा कोणीही साथ देणारा नाही आहे हे जाणून पस्तावतो.याचप्रकारे स्त्री–पुरुष मनुष्य देह सुटून गेल्यानंतर काळाच्या देशात अटकतात,चौऱ्यांशी लक्ष योनीत पडतात आणि अशा महादु:खाच्या चौऱ्यांशी लक्ष योनीतून काढण्यासाठी संत इच्छा असूनही मदत करु शकत नाही आणि एकट्यालाच चौऱ्यांशी लक्ष योनीचे सर्व दु:ख भोगावे लागते तेव्हा ते स्त्री–पुरुष मनुष्य देह कर्मामध्ये,भोगामध्ये,रामजी सोडून अन्य देवतांची भक्ती करण्यामध्ये गमवून दिला म्हणून पस्तावतात. ।।२०।।

**ठगा ठग्यो मुसाफिर रूनो ।। द्रब संच्यो म्हे खोयो ।।**
**झूट कपट कुमता ठग लीनो ।। काम बिषे रस बोयो ।।२१।।**

वाटसरु आयुष्यभर द्रव्य संचय करतो आणि प्रवासास निघतो.त्या प्रवासात त्याचे जन्मभर संचित केलेले धन ठग ठगून घेतात.ठगल्या गेल्यावर म्हणजे धन गमवून

दिल्यावर वाटसरु नाराज होतो,दु:खी होतो.याचप्रकारे जीवाला खोटे म्हणजे कुटूंब परीवार,धन,राज यांच्या मोह ममताने,कपट म्हणजे गर्भात करार केला त्या रामाला सोडून अन्य देवतांच्या भक्त्यांनी,कुमता म्हणजे नर्कात टाकणारी निचहून निच कर्म करणाऱ्या मतीने,काळाच्या मुखात टाकणारे काम तसेच पाची विषय वासनांनी असे वेगवेगळ्या प्रकारच्या ठगांनी मुश्किलीने प्राप्त केलेल्या मनुष्य तनरुपी धनाला ठगून घेतले आहे आणि मनुष्यरुपी धनाच्या वर मोक्षरुपी धन कमविण्याची वेळ हातातून निघून गेली आहे आणि वरुन ८४ लक्ष योनीचे दुखांचे फंद गळ्यात पडून गेले आहे म्हणून जीव पस्तावा करतो आहे.।।२१।।

**सत्तगुरू शब्द दियो नही शिंवऱ्यो ।। गाफल जलम गमायो ।।**
**झुठी गल्ला गाँव में राळी ।। खेत चिड़ कल्या खायो ।।२२।।**

जसे शेतकऱ्याने शेत पेरुन दिले आणि त्याचे पिक ही चांगले येऊन गेले परंतु राखण न करता गप्पा मारत बसून राहिला,त्या खोट्या गप्पा मारण्यात,गावात फिरल्याने जसे शेत चिमण्यांनी खाऊन घेतले असाच मनुष्य देह अवतार मिळाला,८४ लक्ष योनीचा फंद कापून देणारे सतगुरु मिळाले,सतगुरुपासून महासुखाच्या मोक्षपदात पोहचविणारा शब्द मिळाला असे सर्व योग जुळून आल्यानंतरही नामाचे स्मरण नाही केले,त्या शब्दाच्या स्मरणात गाफल राहून अनमोल मनुष्य देह विषय वासनांच्या विकारात तसेच त्रिगुणी मायेच्या करण्यांमध्ये गमावून दिला.।।२२।।

**म्रत लोक मानव पिस्ताया ।। देव लोक मे देवा ।।**
**भक्तहीण सबी पिस्तासी ।। बिसऱ्या हर की सेवा ।। २३ ।।**

जे मनुष्य देहात हरची भक्ती करणे विसरुन गेले असे सर्व भक्ती हीन मनुष्य तसेच देवलोकाचे सर्व देवता काळाचे फंद गळ्यात पडल्यावर पस्तावतात.।।२३।।

**ध्यान समाध समे कोई साधु ।। देव लोक मे जावे ।।**
**जिन कुं देख करे अब लाखा ।। भक्त काज पिस्तावे ।।२४।।**



हरचे ध्यान करणाऱ्या प्रत्येक साधूचे पिंड हे खंड आणि ब्रम्हंड बनते.तो साधू बंकनाळने ज्या रस्त्याने ब्रम्हडांत चढतो.त्या रस्त्यात त्याला स्वर्गलोक लागतो.स्वर्गलोकातील देवता साधूला सुदर्मा सेजमध्ये ध्यानस्थ बसलेले पाहून आम्ही मनुष्य तन मिळाले तेव्हा हरची भक्ती नाही केली याचा पस्तावा करतात आणि साधूला काळापासून सुटलेले पाहून सर्व देवता मनुष्य तनाची अभिलाषा करतात. ।।२४।।

**इन्द्र लोक में सेज सुदर्मा ।। वां जन बेसे जाई ।।**
**देव प्रष्ण करे मिल बुजे ।। देव ई उतर लाई ।।२५।।**

 ।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

साधू ज्या सुदर्मा सेजमध्ये हरचे ध्यान लावून बसलेले आहे ती सुदर्मा सेज इंद्र लोकात आहे.त्या साधूला सुदर्मा सेजेत बसलेले पाहून तेथील देवता आपसात ज्ञानी देवतांना काही प्रश्न करतात आणि ते ज्ञानी देवता आपसातच त्या प्रश्नांचे उत्तर ही देतात. ।।२५।।

लोकां में को लोक बडो हे ।। देही मे को देहा ।।
नांवा मे को नाम बडो हे ।। सेवा मे को सेवा ।।२६।।


देवता आपसात ज्ञानी देवतांना प्रश्न करतात की,लोकामध्ये मोठा लोक कोणता आहे?देहामध्ये मोठा देह कोणता आहे?नामामध्ये काळ सोडविणारे नाम कोणते आहे?तसेच सेवामध्ये म्हणजे भक्तीमध्ये श्रेष्ठ भक्ती कोणती आहे? ।।२६।।

लोकां मे मृत लोक बड़ो हे ।। देही मे नर देहा ।।
नांवा मे बड़ो राम नाम हे ।। सेवा मे सन्त सेवा ।।२७।।

ज्ञानी देवता उत्तर देतात की लोकामध्ये मृत्यूलोक मोठा आहे,देहामध्ये मनुष्य देह मोठा आहे,नामामध्ये,रामनाम मोठे आहे तसेच सेवेमध्ये संत सेवा मोठी आहे असे उत्तर देतात.।।२७।।

नांव बिना जन मोख न पोंते ।। नांव संचे नर देही ।।
मृत लोक बिन साध न निपजे ।। कीजो रामस्नेही होई ।।२८।।

ज्ञानी देवता अन्य देवतांना ज्ञानाने समजवितात की,जगामध्ये अनेक नाम आहे त्या सर्व नामांनी हंस मोक्षात पोहचत नाही.हंस मोक्षात फक्त रामनामानेच पोहचतो म्हणून




अनेक नामामध्ये रामनामच मोठे आहे.याचप्रकारे जगामध्ये वैकुंठ, कैलास,सतलोक,स्वर्गाच्या चार पुऱ्या,२१ स्वर्ग,१३ पाताळ, ८४ लक्ष प्रकारचे देह असे अनेक देह आहे परंतु मनुष्य देह सोडून स्वर्गादिक, नरकादिक तसेच चौऱ्यांशी लक्षच्या कोणत्याही योनीमध्ये मोक्षात घेऊन जाणाऱ्या नामाचा संचय होत नाही म्हणून सर्व देहामध्ये मनुष्य देह मोठा आहे.जगामध्ये मृत्यूलोक, पाताळलोक,स्वर्गलोक,वैकुंठ,कैलास,सतलोक,शक्तीलोक,३ ब्रम्हचे १३ लोक असे अनेक लोक आहेत.या सर्वात मृत्यूलोक मोठा आहे.या मृत्युलोकाच्या शिवाय अन्य कोणत्याही लोकामध्ये मोक्ष देणारे साधू निपजत नाही,साधू फक्त मृत्युलोकातच निपजतात.अशा सतस्वरुप साधूची सेवा म्हणजे संगत केल्यावरच रामाशी स्नेह म्हणजे प्रेमभाव होतो आणि घटात राम प्रगटतो.सतस्वरुपी साधू सोडून मायावी साधू संतांची सेवा म्हणजे संगत केल्यावर ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,अवतारांच्या मूर्त्यांची किंवा वेदातील क्रिया करण्या केल्याने घटात काळापासून मुक्त करणारा राम प्रगटत नाही. ।।२८।।

आ कारणीक देह सुख दु:ख भोगे ।। शिवरण पडे न संचे ।।

वा कारजीक देह करे सो होवे ।। युं नर तन सुर बंचे ।।२९।।

ज्ञानी देवता प्रश्न कर्त्या देवतांना समजवितात की,आमचा देह हा कारणीक देह आहे, तेजपुंजाचा देह आहे.हा स्वर्गाचे सुख–दु:ख भोगण्याचा देह आहे.या देहाने रामाचे स्मरण होते परंतु कितीही स्मरण केले तरीही घटामध्ये एक शब्द ही संचित होत नाही.जसा आपला देह आहे तसा मृत्युलोकाच्या मनुष्यांचा ही देह आहे.तो कारजीक देह आहे, मलमूत्राचा देह आहे. त्या देहाने जे संचित करणे चाहाल ते सर्व संचित होऊन जाते म्हणजे मनुष्य देहात रामनाम स्मरण केल्यावर रामनाम संचित होऊन जाते आणि अशा संचित होण्याच्या गुणाने काळापासून मुक्त करविणारा राम घटात प्रगट होऊन जातो.या गुणाच्या कारणाने हे सर्व देवी देवता मनुष्य तनाची चाहणा करतात. ।।२९।।

मनछया भोग सरब सुख हाजर ।। सेज सुदर्मा मांही ।।

आवागवण मिटे नही हंस की ।। ओ सुख थिरता नाही ।।३०।।

या आपल्या देवांच्या सुदर्मा सेजेमध्ये जे जे मनाचे भोग म्हणजे सुख चाहतात ते सर्व भोग म्हणजे सुख लगेच हजर होऊन जातात परंतु आपला चौऱ्यांशी लक्ष योनीमध्ये येण्या–जाण्याचा फेरा मिटत नाही.याकरीता सुदर्मा सेज पकडून स्वर्गाचे सर्व सुख आम्हाला सदा राहणारे सुख राहत नाही,स्वर्गादिक सोडून चौऱ्यांशी लक्ष योनीत पडल्यानंतर समाप्त होणारे राहतात.।।३०।।

पोंते जुरा काळ नित्त झांपे ।। जब ही सुखरत खूटे ।।

बारम्बार पड़े चोरांसी ।। जम की मार न छुटे ।।३१।।

आम्ही मनुष्य देहाने कमवून आणलेले सुकृत खुंटताच म्हातारपण व्यापते आणि पुर्ण सुकृत खुंटल्यावर काळ येऊन आम्हाला झपाटतो आणि हा काळ आम्हाला चौऱ्यांशी लक्ष प्रकारच्या वेगवेगळ्या योनीत टाकून सहन न होणारा मार देतो.हा मार आमचा सुटत नाही. ।।३१।।

आवागवण जलम ओर मरणा ।। भक्ति बिना दु:ख भारी ।।

माया मोह बिषे सुख मांही ।। साची सूंज बिसारी ।।३२।।

रामाच्या भक्ती विना आवागमनाचा म्हणजे चौऱ्यांशी लक्ष वेळेस जन्मण्याचे आणि मरण्याचे दु:ख खूप भारी आहे.आम्ही जेव्हा मनुष्य देहात होते तेव्हा माया मोहात आणि विषय वासनांच्या सुखात लीन होऊन गेले होते आणि रामनामाच्या स्मरणाची खरी समज विसरुन गेले होते.।।३२।।

मृत लोक हुँता नर देही ।। राम नाम नही संच्यो ।।

जप तप जिग किया ब्रतादिक ।। सुरग लोक सुख बंछयो ।।३३।।

आम्ही ही मृत्युलोकात मनुष्य शरीरात होते त्या वेळेस आम्ही रामनामाचा संचय केला नाही.अमरलोकाच्या सुखांची चाहणा केली नाही.जप,तप,यज्ञ,व्रत इत्यादी करुन स्वर्ग प्राप्तीची चाहणा केली आणि आता स्वर्गात येऊन वाईट तऱ्हेने अटकून गेले.।।३३।।

**सांकळ जड़यो सिंघ पिस्तावे ।। अब कोहो कुंण छुडावे ।।**
**पाप पुन्न कंचन लोहो बेड़ी ।। पांव पडे दुख पावे ।।३४।।**

आपली साखळीत बांधलेल्या सिंहासारखी गती झाली आहे.जगात साखळी लोखंडाची तसेच कंचनची राहते.पापकर्म करणारे नरकात पड्तात आणि दु:ख भोगतात आणि जप,तप,यज्ञ,असे उंच कर्म करणारे स्वर्गात पोहचतात आणि स्वर्गाचे सुख दु:ख भोगतात.सिंहाच्या पायात लोखंडाची बेडी पड्ली किंवा सोन्याची बेडी पड्ली तरी दोन्ही बेड्यांनी सिंहावर दु:खच पड्तात.अशाप्रकारे आम्हाला पुण्यरुपी कंचन बेडी लागलेली आहे.जसे सिंहाला कंचनच्या बेडीने लोखंडाच्या बेडी इतकेच दु:ख होते तसे आम्हाला नरकात पड्लेल्या जीवांच्या सारखेच आवागमनाचे काळाचे दु:ख राहते.सोन्याची बेडी जशी दिसायला लोखंडापेक्षा चांगली राहते परंतु सिंहाला दु:ख देण्यात सारखीच राहते तसाच स्वर्ग,नरकाहून चांगला दिसतो परंतु चौऱ्यांशी लक्ष योनीचे दु:ख भोगण्याकरीता सारखाच राहतो.जशी सिंहाच्या पायात लागलेली बेडी मग ती लोखंडाची राहो किंवा सोन्याची कोणी सोड्वू शकत नाही अशीच आमची आवागमनाची बेडी स्वर्गाला पाहून कितीही आनंद देणारी वाटली तरीही कोणी सोड्वू शकत नाही. ।।३४।।

**काया कळस बिषे रस भरीयो ।। कहो किसी बिध छुटे ।।**
**खान पान मर्कट की मुठी ।। काळ कुंजडो कुटे ।।३५।।**

या आपल्या पुण्य कर्माने आपणास देवलोक मिळाला आहे.या देवलोकाहून चौऱ्यांशी लक्ष योनीत भोगात न जाता सरळ मनुष्य देहात येण्याची रीत नाही आहे.तो देवलोक देवलाकाचे सुख भोगून चौऱ्यांशी लक्ष योनी भोगण्यास बंधनकारक आहे. या देवलोकाचा आपला देह विषयरसांनी भरलेला घडा आहे.आपले शरीर येथील खाण्याचे,पिण्याचे, अप्सरांशी भोग करण्याचे,गाणे ऐकण्याचे,अमृतासारखे स्वादिष्ट पदार्थ पिण्याचे, उत्तम तऱ्हेची सुगंधी घेण्याचे विषयांचे सुख भोगून घेण्याच्या आवश्यकतेने ओतप्रोत भरला आहे.जर हे सुख येथे नाही घेतले तर हा आपला देह मेल्यासारख्या यातना भोगतो म्हणजे हा देह येथील सुख घेण्यासाठी अस्वस्थ राहतो.आपल्याने येथील सुख माकडाच्या मुठ्ठी सारखे सोड्ले जात नाही.जसे माकडाला पकड्ण्यासाठी छोट्या तोंडाच्या मड्क्यात फुटाणे,दाण्यासारखी वस्तू ठेवून देतात. त्याच्यातून हाताने काढून काढून माकड खात राहतो.पुन्हा पुन्हा मड्क्यात मुठ्ठी टाकत राहतो आणि काढून खात राहतो.हळूहळू मुठ्ठीत पहिल्यापेक्षा जास्त वस्तू पकड्त राहतो.मुठ्ठीत जास्त

वस्तू पकडता पकडता मुठ्ठी मडक्याच्या तोंडातून बाहेर निघू शकत नाही इतकी मुठ्ठीत पकडलेल्या वस्तूने मुठ्ठी मोठी होऊन जाते.इकडे वस्तुने भरलेली मुठ्ठी बाहेर निघत नाही आणि मुठ्ठी सोडून रिकामा हात बाहेर काढला तर ती वस्तू मडक्यात पडून जाते म्हणुन मुठ्ठीतुन वस्तुही सोडण्याची इच्छा थोडीसीही होत नाही.अशाप्रकारे आपल्याकरीता देव लोकांचे विषय वासनांचे सुख आहेत.हे सुख त्यागण्याची थोडीशीही इच्छा राहत नाही.जसे मडक्यात मुठ्ठी अडकलेल्या माकडाला माकड पकडणारा मदारी पकडून घेऊन जातो तसेच आपल्यास ही काळ पकडून चौऱ्यांशी लक्ष योनीच्या दुःखात टाकतो.।।३५।।

**युं सब देव करे पिस्तावो ।। अब नर तन कद पावां ।।**
**जामण मरण काळ भे मेटर ।। प्रमधाम कब जावां ।।३६।।**

याप्रमाणे येथे सुदर्मा सेजेवर बसलेले सर्व देवता पस्तावा करत आहेत आणि मनुष्य देह केव्हा मिळेल?केव्हा जन्मणे-मरणे,आणि काळाचे भय मिटेल?तसेच परमधामास केव्हा जाऊ?याची चिंता करतात. ।।३६।।

**अहो प्रभू मानव तन दिजे ।। भरत खंड के माही ।।**
**केवळ भक्त करा संत सेवा ।। ओर करां कुछ नाही ।।३७।।**

या चिंतेने ते सर्व देव भरत खंडात मनुष्य तन मिळावे यासाठी प्रभूला प्रार्थना करतात आणि प्रभूला सांगतात की,मनुष्य तन मिळाल्यावर कैवल्य प्राप्त करवून देणाऱ्या संतांची सेवा करु,संगत करु आणि कैवल्य प्राप्त करु.कैवल्याच्या शिवाय जप,तप, सत,यज्ञ,व्रतादिक हे काहीही करणार नाही. ।।३७।।

**ब्रम्हा देव बिसन सिव देवा ।। इन्द्र देव पिस्तावे ।।**
**धिन धिन सन्त भक्त कर केवळ ।। प्रमधाम कुं जावे ।।३८।।**

ब्रम्हा,विष्णु,महादेव,शक्ती,इंद्र तसेच सर्व देवी-देवता कैवल्याची भक्ती करुन परमधामास जाणाऱ्या संतांना पाहून धन्य आहे हे संत,धन्य आहे हे संत हे निजमनाने ज्ञानदृष्टीने म्हणतात. ।।३८।।

**जामण मरण जीत मोहो माया ।। जुवा काळ भे नाही ।।**
**अमर लोक मे आज पहुँता ।। जीत निसाण बजाई ।।३९।।**

या संतांनी मोहमाया जिंकून घेतली,जन्म-मरणाचा फेरा कापून घेतला,म्हतारपणाचे तसेच काळाचे भय मिटवून दिले आणि होणकाळाला जिंकून आज अमर लोकात पोहचून गेले. अशाप्रकारे काळाला तसेच मोहमायेला जिंकून घेतले हे निशाण जगात वाजवून दिले. ।।३९।।

**अमर लोक मे बटे बधाई ।। सन्त सामा चल आवे ।।**

देव लोक मे जे जे बाणी ।। पेप फूल बरसावे ।।४०।।

संत मृत्युलोकातून मोहमाया आणि काळाला जिंकून अमरलोकास पोहचून राहिले ही बातमी अमरलोकात पोहचताच अमरलोकाचे सर्व संत अमरलोकात आपसात शुभेच्छा वाटून राहिले आहेत.संताने काळाला जिंकले या आनंदाने तेथील संत उत्सव साजरा करत आहेत तसेच नवीन येणाऱ्या संताला आनंदाने स्वागत करुन अमरधामात आणण्यासाठी सर्व संत समोर अगवाणी करीता येऊन राहिले आहेत.अमरलोकास जायच्या वेळी रस्त्यात देवलोक लागतो.त्या देवलोकात अमरलोकास जाणाऱ्या संताचा सर्व देवता जयजयकार करुन राहिले आहेत आणि संतांवर फूलांचा वर्षाव करुन राहिलेत. ।।४०।।

जम देव सुंपे कोटवाळी ।। रिध भंडार कुबेरा ।।
इन्द्र कहे मे दास तुमारा ।। लेवो सिंघासण मेरा ।।४१।।

अमरलोकास जाणाऱ्या संताशी यमदेव आपली कोतवाली घ्यायला प्रार्थना करतो आणि आपल्या यमलोकात यमलोकाचा मालक बनून यमलोकातच राहण्यात सांगतो. अशाप्रकारे कुबेर आपले रिध्दीचे भंडार संतांच्या चरणात टाकून रिध्दीपासून सर्व तऱ्हेचा आनंद घ्यायला सांगतो आणि इथेच राहायला सांगतो परंतु हे संत यमाची आणि कुबेराची एक ही गोष्टी न ऐकता इंद्रलोकात जातात.इंद्र ही आपले इंद्र सिंहासनास ग्रहण करायला सांगतो आणि ३३ कोटी देवतांच्या सोबत आपला दास बनून राहिल म्हणून प्रार्थना करतो.।।४१।।

ब्रम्हा कहे घड्रो तुम भंजो ।। शिव कहे करो संघारा ।।
बिसन कहे किजे प्रतपाळा ।। ओ बेकुंठ तुमारा ।।४२।।

संत इंद्राच्या देशात न थांबता ब्रम्हाच्या लोकास जातात.ब्रम्हा ही संताला सतलोकातच राहा आणि सृष्टीचे घडभंजन करा ही संताला प्रार्थना करतात परंतु संत ब्रम्हाची गोष्ट न ऐकता पुढे कैलासास रवाना होतात.कैलासात कैलासचा मालक शंकर संताला आपला संहार करण्याचा हुद्दा धारण करुन कैलासातच थांबण्याची विनंती करतो.संत कैलासातही न थांबता वैकुंठात येतात.वैकुंठात विष्णू संताचे स्वागत करतो आणि संताला सर्व सृष्टीचे पालन करण्याचा हुद्दा ग्रहण करायला सांगतो परंतु संत वैकुंठात विष्णूचे थोडेसेही न ऐकता पुढे जाण्यास निघतात. ।।४२।।

चिदानंद कहे अंछया तेरी ।। आ रचना आप रचावो ।।
शिव ब्रम्ह कहे श्रूप हमारो ।। ओ ने:चळ पद पावो ।।४३।।

संत पुढे चिदानंदब्रम्हला पोहचतात चिदानंदब्रम्ह ही आपली रचना करण्याची इच्छा ही संताला सोपवतात अणि इच्छेला स्विकारुन रचना करायला सांगतात आणि इथेच

माझ्या पदात राहण्याची प्रार्थना करतो परंतु संत चिदानंदाचे न ऐकता पुढे शिवब्रम्हच्या पदास पोहचतात.शिवब्रम्हही संताला आपले निश्चल स्वरुपाचे पद ग्रहण करण्याची विंनती करतो आणि निश्चल बनून आपल्या शिवब्रम्हपदात राहायला सांगतो.।।४३।।

**वे निरब्रत पुरुष पड़े क्यूं परब्रत ।। सरब पदार्थ त्यागी ।।**
**बंदगी तालब केवळ ग्यानी ।। वां री सुरत साहिब सुं लागी ।।४४।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,मोहमाया,काळ,आवागमनाच्या चक्रातून निवृत्त झालेले पुरुष ज्या मायेच्या सुखांनी आवागमनाच्या चक्रात अटकून राहत होते तशा प्रवृत्त पसाऱ्यात पुन्हा पड्ने नाही चाहत.ते बंदगीचे तालब म्हणजे रामाच्या सेवेत लागलेले कैवल्य ज्ञानी आहेत.त्यांची सुरत साहेबात लागली आहे.ते मायेच्या सुखांमध्ये म्हणजे ज्यात काळ आहे,आवागमन आहे अशा दुष्ट परावृत्त चक्रामध्ये परत पड्त नाही. ।।४४।।

**सुळज्या हंस जके क्युँ उळझे ।। देव सबे उळझावे ।।**
**तीन लोक का तजे पदारथ ।। चोथो लोक बसावे ।।४५।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,या सर्व मायामोह,आवागमन,म्हातारपण आणि काळाच्या जाळापासून सुलझलेले संत यम,कुबेर,ब्रम्हा,विष्णु,महादेव,चिदानंदब्रम्ह, शिवब्रम्ह जे माया मोह,आवागमन,म्हातारपण आणि काळाच्या जाळ्यात वाईट तऱ्हेने गुंतलेले आहेत अशा जाळ्यात पुन्हा कां गुंततील?त्यांनी चौथ्या लोकाचे अद्भूत सुख प्राप्त करण्याकरीता तीन लोकंचे सर्व सुख त्यागले आहे आणि अद्भुत सुख घेण्या करिता चौथ्या लोकात वसण्याकरीता निघून गेले आहेत. ।।४५।।

**ब्रम्हा बिस्न महेसर ईसर ।। सब युं करे उदासी ।।**
**ओ परब्रत पसारो छाड़ हुवां कद ।। निरब्रत देश का बासी ।।४६।।**

अशा संतांच्या अद्भूत सुखांच्या चौथ्या देशाला प्राप्त करण्याचे पाहून ब्रम्हा,विष्णू, महादेव हे देवता उदासी करतात आणि काळाच्या जबड्यात फसलेला परावृत्त मायेचा पसारा त्यागून मायेच्या परेच्या निवृत्त देशात आम्ही केव्हा जाऊ?याचा विचार करतात. ।।४६।।

**तीन लोक की पास गळा मे ।। बंदगी बणे न काई ।।**
**उपजत खपत करो प्रतपाळा ।। आ बिपता ब्रम्ह लगाई ।।४७।।**

ब्रम्हा,विष्णू,महादेव विचार करतात की,तीन लोकांची उत्पत्ती करणे,प्रतिपाळ करणे आणि खपविणे म्हणजे संहार करणे ही फाशी आपल्या गळ्यात पड्ली आहे.या विपत्तीच्या कारणाने रामाची बंदगी म्हणजे भक्ती आपल्याने होत नाही.हे उत्पत्ती करणे,प्रतिपाळ करणे,संहार करणे यात अस्सल सुख आहे हे समजून हे पद मनुष्य देहात जेव्हा

आपण होतो तेव्हा आपणच मायेची भक्ती करुन ब्रम्हकडून मागितले आहे.आता चौथ्या पदात जाण्याकरीता तीन लोकाचे हे पद आपल्यासाठी विपत्ती बनून गेले आहेत असे ब्रम्हा,विष्णू,महादेव फिकीर करत आहेत. ।।४७।।

**तीन लोक का तीनुं मालक ।। से अटके नही कोई ।।**
**पातस्याहा का अेदी आगे ।। भूपत हाजर होई ।।४८।।**

ब्रम्हा,विष्णू,महादेव आपसात सांगतात की,आपण तिन्ही लोकांचे मालक आहोत तरीही आपल्याने हे संत प्रार्थना करुन ही थांबले नाही जात होते आणि त्यांना जबरदस्तीने अटकावणे चाहत होते तरीही ते अटकविले जाऊ शकत नाही.आमची तिघांची स्थिती बादशहाच्या ऐधी म्हणजे प्रतिनिधीच्या समोर राजा जसा दासभावाने हजर होतो आणि चूक केल्यावर ऐधीच्या हातचा मारही खातो तशी संतांच्या समोर बनलेली राहते. ।।४८।।

**अगम देस का सतगुरू अेदी ।। शब्दा मार मचावे ।।**
**सुता हंसा सुण सुण जागे ।। सो सतगुरू पद पावे ।।४९।।**

अगम देशाचे सतगुरु हे ऐधी म्हणजे प्रतिनिधी आहेत.ते अगम देशाचा शब्दांचा मार जीवांचे भ्रम मिटविण्यासाठी मचवितात.माया,मोह तसेच भ्रमात झोपलेले हंस सतगुरुचे ज्ञान ऐकून ऐकून महासुखाचे असे काळाच्या पलीकडचे सतगुरु पद प्राप्त करतात. ।।४९।।

**जाग्या हंस जके नही सोवे ।। सतगुरू शब्द बिचारे ।।**
**अगम देस की अणभे वाणी ।। अनंत हंसा कूं तारे ।।५०।।**

त्या संतांचे ज्ञान ऐकून ऐकून जागृत झालेले संत पुन्हा झोपत नाही म्हणजे माया मोहात पडत नाही.ते संत माया मोह तसेच भ्रम मारणारे सतगुरु शब्दाचे मनन करतात. अशी ही अगम देशाची काळाच्या भयापासून मुक्त करणारी अणभे वाणी आहे.ही वाणी अनंत हंसांना भवसागरातून तारते.।।५०।।

**अगम देस की अणभे अेसी ।। सुण तांई सुख आवे ।।**
**गरजे शब्द सुधारस बरसे ।। भरम करम सब ढावे ।।५१।।**

त्या संतांपासून अगम देशाची अणभे वाणी ऐकताच धारण करणाऱ्यांना मायेच्या ज्ञान आणि ध्यानापासून मिळणाऱ्या सुखाहून वेगळे सुख मिळते.त्या संतांचा शब्द संताच्या घटात गरजतो आणि अमृतासारखा घटात बरसतो.त्यांच्या शब्दाने सर्व भ्रम व कर्म ढासळून पडतात. ।।५१।।

**लगे समाध इकि सुं ब्रहमंड ।। अमर देश वे जाही ।।**
**के सुखराम जके जन जग मे ।। भूल न भव जल आही ।।५२।।**

त्या संताच्या शब्दाने संत २१ ब्रम्हंड म्हणजे २१ स्वर्ग पार करतात आणि त्यांची दहाव्याद्वारात समाधी लागते.याप्रकारे संत अमरदेशात पोहचतो.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,अमरलोकास पोहचलेले संत भुलूनही पुन्हा या भवसागरात येत नाही. ।।५२।।

**अमर लोक का अमर प्रेस्ता ।। से हंस लेवण आवे ।।**
**म्रत लोक का सन्त प्रेस्ता ।। दे परमोद पठावे ।।५३।।**

मृत्युलोकात अगम देशाचा उपदेश देऊन भ्रम,कर्म कापण्यासाठी केवली संतरुपात प्रेस्ते(पार्षद)बनून येतात.हे संत प्रेस्ते हंसाला घटात दहाव्याद्वारापर्यंत तसेच दहाव्या द्वाराच्या पलीकडच्या अमरलोकात पोहचवितात.असे दहाव्याद्वाराच्या पलीकडे पोहचलेल्या संतांना त्यांचा अंतसमय आल्यावर अमरलोकातून अमर प्रेस्ते अमरलोकास घेऊन जाण्याकरीता येतात आणि सदासाठी अमरलोकास घेऊन जातात. ।।५३।।

**निकास का चवदा दरवाजा ।। हंस दसु दिस जाही ।।**
**सामा आंण बधावे साधू ।। आगम करे बधाही ।।५४।।**

हंसाच्या अंतीम समयी देहातून निघण्याचे(दोन कान,दोन डोळे,दोन नाकपुड्या,एक तोंड,दोन स्तन,एक नाभी,दोन लिंग,एक गुदा आणि दहावेद्वार असे)चौदा दरवाजे आहेत. जसे कर्म आणि भक्ति करतात तसे जीव चौदा दरवाज्यातून वेग-वेगळ्या दिशेने निघतात.लिंग आणि गुदा या खालच्या दिशेने जाणारे हंस नरकात पडतात.स्तन,डोळे, कर्ण(कान)नाक,तोंड या दिशेने जाणारे हंस स्वर्गादिकात जातात तसेच नाभीतून जाणारे हंस मृत्युलोकात पोहचतात.याचप्रकारे उपरांडे म्हणजे दहाव्याद्वाराने जाणारे हंस चौथा लोक म्हणजे अमरलोकास जातात.येथून जाणाऱ्या संतांचा तेथील साधू समोरा समोर येऊन भारी आगत स्वागत करतात आणि मृत्युलोकातून निघालेले संत अमरलोकास पोहचताच स्वागत करायला आलेले सर्व संत संताचा अमरलोकास पोहचण्याचा शुभ समाचार पूर्ण अमरलोकात देतात आणि या भारी शुभ घटनेची शुभेच्छाही अमरलोकाच्या सर्व संतांना देतात.।।५४।।

**ओर त्रपत ममता भई पुरण ।। जन दरसण नित चावे ।।**
**सन मुख आण प्रेसतो बुजे ।। अजहुँ सन्त कोई आवे ।।५५।।**

येथून तेथे पोहोचलेल्या सर्व संतांना येथून जाणाऱ्या नवीन संतांच्या दर्शनाची नित्य चाहणा राहते.तेथील संताला बाकी कोणती ममता राहत नाही म्हणजे बाकी सर्व ममता तेथील संतांची तृप्त झालेली राहते.असे तेथे पोहचणाऱ्या संताच्या समोर जाऊन प्रेस्ता तसेच सर्व संत तुमच्या सारखा काळाला जिंकुन अजुनही कोणी संत येथे येऊन राहिला आहे कां?असे अती आतुरतेने विचारतात.।।५५।।

हरक कोड उछाव नवा नित्त ।। पल पल प्रित सवाई ।।
देख्या सन्त हियो युं हर्के ।। ज्युं रंक नव निध पाई ।।५६।।

येथून अमरलोकास जाणाऱ्या संतास पाहून तेथील सर्व संतांना हर्ष होतो आणि लाड येतो. तेथील संत येथून पोहचणाऱ्या संताच्या निमित्ताने नित्य नित्य नवे नवे उत्सव करतात आणि पोहचलेल्या संताशी तेथील संत प्रत्येक नव्या क्षणाला सवाई प्रिती करतात.येथून पोहचलेल्या संताला पाहून तेथील संतांचे हृदय जसे मृत्युलोकात रंक म्हणजे दरिद्री मनुष्याला नवनिधी मिळाल्यावर हर्ष होतो असा हर्ष होतो.।।५६।।

अमर लोक मे सन्त बिराजे ।। ज्यारां सुख बताऊँ ।।
गुप्ता भेद बेद नही जाणे ।। सो प्रगट कहे गाऊँ ।।५७।।

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,येथून अमरलोकात पोहचलेल्या संताचे सुख मी तुम्हाला दाखवितो.हे अद्भूत सुख भेद म्हणजे शंकर आणि वेद म्हणजे ब्रम्हाला थोडेसे ही माहित नाही आहे असा गुप्त आहे.ते सर्व गुप्त सुख मी तुम्हा सर्वाना प्रगट करुन सांगतो आहे.।।५७।।

अमर लोक मे ओ गुण पड़ीयो ।। थिरे राज कहुँ तोई ।।
जुरा काळ जंवरो नही पुंते ।। जलम मरण नहीं दोई ।।५८।।

अमरलोकात म्हातारपण,काळ तसेच जन्मणे–मरणे नाही आहे म्हणून येथून पोहचणाऱ्या संतात म्हातारपण न येणे,काळाने न खाणे,जन्मणे–मरणे यात न येणे हा कुद्रती गुण प्रगट होतो.या कारणाने तेथे पोहोचलेला संत स्थिर म्हणजे अमर राहतो आणि सर्व अमर सुखांचा राजा बनून राज भोगतो.।।५८।।

मेहर बान सब ही बड़ पुरुषा ।। गेब छत्तर शिर छाया ।।
केर कुमेर नहीं मे मेरी ।। काम क्रोध मोहो माया ।।५९।।

तेथे पोहोचलेले सर्व संत अद्भूत सुखांची मेहेर झालेले महापुरुष आहेत.त्या संतांच्या शिरावर कुद्रती कोणाला न समजणारी रामजीची छत्रछाया आहे.तेथे सुख मिळण्याची कोणतीच कसर राहत नाही.तेथे कोणाचा कोप ही राहत नाही आणि तेथे मी,माझे हा भाव ही राहत नाही.तेथे येथल्या सारख्या काम,कोध,मोह,माया राहत नाही. ।।५९।।

अेक ई रूप तेज तप अेकी ।। बड़ा पुरुष बड भागी ।।
आप उजाळा आपही सुझे ।। अखन्ड झिगा मिग लागी ।।६०।।

तेथे राहणारे सर्व एकसारखे तेज तपाचे आहेत.तेथे राहणारे सर्व महापुरुष आणि भाग्यवान आहेत.त्यांच्या देहातूनच निघणाऱ्या प्रकाशाने ते दिसू लागतात.तेथे पोहचलेल्या संतांच्या प्रकाशाची अखंड झगमगाट लागली आहे.।।६०।।

मिन्दर झिगा मिग रतना छाया ।। बाग झिगा मिग फूले ।।

**सन्त झिगा मिग द्रब सरीरा ।। कोटक सुरज झूले ।।६१।।**

रत्नांनी आच्छादलेल्या मंदिराच्या झगमगाटाने मंदिर झगमग करते.फूलांच्या झगमगाटाने बाग फूललेली दिसते तसे संतांच्या दिव्य शरीरातून निघणाऱ्या कोटी सूर्यांच्या प्रकाशाने संतांचे दिव्य शरीर झगमगाट करते.।।६१।।

**दीप झिगा मिग दिपक सूजे ।। हिर झिगा मिग हीरा ।।**
**शब्द झिगा मिग सब जग सूजे ।। सोजे सकळ सरीरा ।।६२।।**

जसे दिव्याच्या झगमगाटाने दिवा माहित होतो,हिऱ्याच्या झगमगाटाने हिरा माहित होतो तसे सतशब्दाच्या झगमगाटाने शरीरातच ब्रम्ह सुचतो आणि शरीर शोधल्यावर सर्व जग शरीरातच दिसते.।।६२।।

**सुरज झिगा मिग सुरज देखे ।। चन्द झिगा मिग चन्दा ।।**
**ब्रम्ह झिगा मिग ब्रम्ह देख्या ।। सो साहेब का बंदा ।।६३।।**

जसे सूर्याच्या झगमगाटाने सूर्य दिसतो.चंद्राच्या झिलमिलाटाने चंद्र दिसु लागतो तसेच ब्रम्ह शब्दाचा झिलमिलाटाने ब्रम्ह दिसतो असा ब्रम्ह जो पाहतो तो साहेबाचा बंदा आहे. ।।६३।।

**मिणीया जोत रतन प्रकासा ।। माळ मोतीया पोई ।।**
**आणंद कळस अमीरस भरीया ।। सुख का सागर सोई ।।६४।।**

साहेबाच्या देशात मण्यांचे,ज्योतीचे,रत्नांचे,माळांमध्ये ओवलेल्या मोत्यांचा प्रकाश संताला आनंद देतात.तेथे आनंद देणाऱ्या अमृताने भरलेले कळस आहेत असा साहेबाचा देश आनंदाचा सागर आहे.।।६४।।

**किस्तुरी कुंजा भर राख्या ।। परमल अेक सरीसी आवे ।।**
**युं सब को सुख एक सरीखो ।। सब हाजर हो जावे ।।६५।।**

जसे कस्तुरीने भरलेल्या कुंजाच्या जवळ बसल्याने बसणाऱ्या सर्वांना एकसारखा सुगंधाचा आनंद मिळतो तसेच साहेबाच्या देशात सर्व संतांच्या समोर सर्व सुख हजर होऊन जातात आणि सर्व संत एकसारखे तृप्त सुख घेतात. ।।६५।।

**वो सुख को सागर सब सुख त्रपत ।। चितवन करे न कोई ।।**
**अनन्त सरोवर अनंताई हंसा ।। केळ करे कहुँ तोई ।।६६।।**

साहेबाचा देश तृप्त सुखांचे सरोवर आहे.त्या सुखांसाठी कोणीही संत चितवन म्हणजे चित्तात विचार करत नाही तरीही सर्व तृप्त सुख संतांच्या समोर हजर होऊन जातात. अशा अनंत सुखांच्या सरोवरावर अनंत ही हंस वेगवेगळे सुख घेण्याची क्रिडा,खेळ, लिला करतात आणि तृप्त सुख घेतात. ।।६६।।

**शिर पर मोड सुजस का बंधीया ।। युं हुवे अमर आवाजा ।।**

।। राम नाम लो, भाग जगाओ ।।

**अणंद बधावा नित ही बाजे ।। कहे धिन धिन महाराजा ।।६७।।**

जसे येथे खेळात कोणी जिंकतात त्यांना जिंकण्याचा मोड म्हणजे पदक बांधले जाते तसेच तेथील संतांच्या शिरावर मोहमाया,काळ आणि आवागमनाच्या चक्रात जिंकून सुखांचा सरोवर प्राप्त करण्याचे सुयशाचे अमर पदक बांधले जाते.तेथे संतांचे मोहमाया, काळ तसेच आवागमनाच्या चक्राचे जिंकण्याचे अमर नाऱ्यांचे आवाज होतात.तेथे जिंकण्याच्या प्रित्यर्थ आनंदाचे बधावे म्हणजे यशाचे शब्द नित्य ऐकू येतात आणि तेथे सर्व संतांना धन्य आहे,धन्य आहे महाराज असे अमर शब्दाचे आवाज ऐकू येतात. ।।६७।।

**अमीरस कुंपा करे सिनाना ।। बस्तर अमर सरीरा ।।**
**हसता मुख मे मोती बरसे ।। पाव धरे जां हिरा ।।६८।।**

येथे जसे पाण्याने भरलेल्या विहिरी असतात तसे तेथे अमृताने भरलेल्या विहिरी असतात.त्या अमृतरुपी पाण्याने सर्व संत स्नान करतात.तेथे संत जे वस्त्र घालतात ते वस्त्र ही अमर असतात,येथल्यासारखे फाटणारे वस्त्र राहत नाही.तेथील संत जेव्हा हसतात तर त्यांच्या तोंडातून मोती पडतात आणि ते जिथे जिथे पाय ठेवतात तिथे तिथे कुद्रती पायांना सुख देणारे मऊ हिरे प्रगटतात. ।।६८।।

**चित्रावण बन कळ ब्रछ फूले ।। बरसे इमरत धारा ।।**
**अमर जडी अमर फळ निपजे ।। पावे सन्त जन सारा ।।६९।।**

तेथे संत ज्या सुखाचे चितवन करतात ते चितवन पूर्ण करणारे चिंतामणी खूप आहेत. तेथे संत ज्या सुखाची कल्पना करतात त्या सुखांना प्रगट करणारे कल्पवृक्षाचे वनचे वन फुललेले आहेत.तेथे आनंद देणाऱ्या अमृताच्या धारांचा वर्षाव होत आहे.तेथे देहाला अमर करणाऱ्या अमरजड्या तसेच अमर फळ नित्य निपजतात.या चिंतामणी पासून निपजणारे सुख,कल्पवृक्षापासून निपजणारे सुख,अमृत धारांचे निपजणारे सुख, अमरफळ तसेच अमर जडीपासून निपजणारे सुख सर्व संत जन प्राप्त करतात.।।६९।।

**पावे सन्त अमर होय बैठा ।। बोर न जामण मरणा ।।**
**कह सुखराम प्रमपद पुंथे ।। सो पिस्तावा करणा ।।७०।।**

अमृत पिऊन,अमर जडी खाऊन तसेच अमरफळ खाऊन तेथील सर्व संत अमर होऊन बसले आहेत.ते संत कधीही जन्म-मरणाच्या फेऱ्यात येत नाही.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री-पुरुषांना सांगतात कि,जसे अनंत संत मनुष्य तनाने रामजीची भक्ती करुन परमपदास पोहचून गेले आणि आवागमनाचा चक्कर कापून महासुखात लिन होऊन गेले आहे तसा मी चौऱ्यांशी लक्ष योनींचे महादुःख भोगून मनुष्य देहात आला आहे पण मी आतापर्यंत रामजीचे स्मरण करुन चौऱ्यांशी लक्ष योनींचे

चक्र नाही कापले आणि अनमोल मनुष्य देहाची वेळ माया मोहात,विषय वासनाच्या सुखात लावून व्यतीत करत आहे या होऊन राहिलेल्या नुकसानाचा पस्तावा करा आणि विलंब न करता परमपदास पोहचण्याची विधी धारण करा. ।।७०।।

**प्रमपिस्तावो नांव ग्रंथ को ।। कियां प्रमपद पावे ।।**
**कह सुखराम ओर पिस्तावा ।। करे स खोटा खावे ।।७१।।**

या ग्रंथाचे नांव परमपस्तावा आहे.या ग्रंथात मनुष्य देहात येऊन रामजीची भक्ति नाही केली तर प्रत्येक मनुष्य तसेच देवता चौऱ्यांशी लक्ष योनीत गेल्यानंतर कसे पस्तावा करतात हे कथले आहे.हा पस्तावा सोडून मायेच्या पद प्राप्तीचा मनुष्य जो ही पस्तावे करतो ते उलट ४३,२०,००० वर्षापर्यंत चौऱ्यांशी लक्ष योनीच्या दु:खात पडण्याचा खोटा म्हणजे चक्कर खाण्याचा पस्तावा आहे असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सर्व स्त्री–पुरुषांना सांगून राहिलेत.।।७१।।

**देह छता असा सुख देखे ।। पुंता पुरुष समाधी ।।**
**कहे सुखराम बिना कोई पूंथा ।। सुण सुण बदे बिवादी ।।७२।।**

मृत्युलोकाचे संत आपल्या देहातच ब्रम्ह समाधीत पोहचल्यानंतर परमपदाचे सर्व सुख पाहून घेतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,अशा मृत्युलोकाच्या संतांद्वारा समाधीत पाहिलेल्या परमपदाचे सुख परमपदात न पोहचलेले स्त्री–पुरुष ऐकून ऐकून आधाराविना त्या पोहचलेल्या संतांच्या सोबत वादविवाद करतात.।।७२।।

**सुभ करम कर सुरगां जावे ।। असुभ किया चोरांसी ।।**
**कह सुखराम भक्त कर केवळ ।। प्रमधाम जन जासी ।।७३।।**

हंस जसे शुभ कर्म करुन स्वर्गादिकास पोहचतात,अशुभ कर्म करुन नर्क तसेच चौऱ्यांशी लक्ष योनीत पडतात.याचप्रकारे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात की,केवल भक्ती करुन हंस परमधामास जातात.।।७३।।

दोहा ।।

**नर तन मे पिस्ताय के ।। रहे राम लिव लाय ।।**
**से हंसा सुखराम कह ।। अमरा पुर कुं जाय ।।७४।।**

जे नर नर तनात मागचे ८४ लक्ष योनीचे दु:ख आठवून आतापर्यंत परमपद नाही मिळण्याचा पस्तावा करतात आणि परमपद प्राप्त करण्याकरीता रामजीशी लिव लावतात ते नर अमरापूराच्या महासुखातच पोहचतात असे आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात.।७४।

**इण कारण भटकत फिरे ।। तीन लोक के मांय ।।**
**आड़ा बादळ भ्रम का ।। सतगुरू सुजे नाय ।।७५।।**

मायेत पाहिजे ते सुख आहे मानून वेद,व्याकरण,शास्त्र,ब्रम्हा,विष्णु,महेश,शक्ती यांच्या मायावी भक्त्यांमध्ये लागून तीन लोकात काळाचे दु:ख भोगत फिरतात आणि प्रत्येक क्षण सुख मिळविण्याकरीता जेथे तेथे भटकत फिरतात.आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात,जसे सुर्याच्या आड्वे आभाळ येऊन गेल्याने प्रकाश देणारा सुर्य सुजत नाही तसेच मायावी भक्त्यांमध्ये दु:खरहीत सर्व सुख आहेत अशी भ्रमित समज होऊन गेल्या कारणाने तृप्त महासुख देणारे सतगुरु सुजत नाही. ।।७५।।

**गुरू बिरम किरपा करी ।। दीनी भगत बताय ।।**
**नि: तर तो सुखराम केहे ।। हुंई रेतो पिस्ताय ।।७६।।**

आदि सतगुरु सुखरामजी महाराज सांगतात कि,माझ्यावर माझे सतगुरु बिरमदासजी महाराजांनी केवल भक्ती देण्याची कृपा केली.जर त्यांनी मला केवल भक्ती देण्याची कृपा केली नसती तर मी ही भ्रमात गुंतून देवी-देवतांच्या भक्तीत लागून राहिलो असतो आणि शरीर सुटल्यावर ८४ लक्ष योनीत केवल भक्ती नाही मिळाली याचा क्षणाक्षणाला पस्तावा करत असता. ।।७६।।

**प्रम पिस्तावो नांव ग्रंथ को ।। जे कोई लहे बिचार ।।**
**भगत ऊपजे भे मिटे ।। पुंथे मोख दुवार ।।७७।।**

या ग्रंथाचे नाव परम पस्तावा आहे.या ग्रंथाला जे जे हंस ज्ञानाने समजतील त्या सर्व हंसांमध्ये केवल भक्ती उपजेल(उत्पन्न होईल)आणि त्या सर्वांचा काळ तसेच जन्म-मरण्याचे भय सदाकरिता मिटून जाईल आणि सर्व हंस सदाकरीता महासुखाच्या मोक्षद्वारात पोहचतील.।।७७।। ।। इति श्री परम पिस्तावा ग्रंथ संपूरण ।।